Letter to YUKRAND from Maharashtra Sarvodaya Mandal.
25/3/1990

महाराष्ट्र सर्वोदय मंडळ,
७२७, सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०.

दिनांक :- २५।०३।१९९०.

स. न. वि. वि.

जग २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर असतांना जगामध्यें अेक नवीन परिवर्तन येऊ लागले आहे. लष्करी हुकूमशाही, साम्राज्यवाद, अेकपक्षीय राजवट, हिंसाचार युध्द व युध्दज्वर यापासून लोकांना मुक्ति हवी असून त्यांना मानवीय स्वातंत्र्य व लोकाभिमुख राज्यपध्दतीची लोकशाही हवी आहे. गेल्या कांही महिन्यांमध्यें कांहीं देशांमध्यें जुन्या विचारांच्या सत्ताधाऱ्यांना दूर व्हावे लागले आहे. मूल्याधारित बदल घडत आहेत. म. गांधीजींच्या अहिंसक व सत्याग्रही परिवर्तनाला मान्यता प्राप्त होत असून गांधीजींच्या विचारांचे महत्व लोकांना जाणवूं लागले आहे. भारतामध्यें देखील अलीकडेच मतपेटीव्दारें अहिंसक मार्गाने सत्ता परिवर्तन घडलेले आहे.

मात्र आपल्या देशामध्यें जातपात, धर्मांधता व सांप्रदायिकता या विचारांना कांहीं राजकारणी लोक खतपाणी घालत आहेत. त्यामुळें देशाच्या अेकात्मतेला गंभीर धोका निर्माण झालेला आहे. त्याच्या जोडीला भ्रष्टाचार, बेकारी, महागाईनेही लोकांना ग्रासलेले आहे. अशा स्थितीमध्यें महात्मा गांधीजींचे विचार व कार्यक्रमच देशाला तारू शकतील. म्हणून गांधीवादी लोकांनी व गांधी विचाराच्या प्रेमींनी ग्रामस्वराज्यमूलक, अहिंसक समाज रचनेचे विचार लोकांच्यापर्यंत पोहचवून संवाद, प्रबोधन संघर्ष, रचना या चतुःसुत्री व्दारें काम करण्याची आवश्यकता आहे.

अलीकडेच सर्व सेवा संघ, केंद्रीय गांधीस्मारक निधी व गांधी शांति प्रतिष्ठान या संस्थांच्या प्रमुखांनी सेवाग्रामला अेकत्र येऊन देशाच्या व जागतिक परिस्थितीच्या संदर्भात " गांधीजीकी चुनौती " असा कार्यक्रम देशासमोर ठेवलेला आहे. त्या आधारे गेल्या नव्हेंबर महिन्यामध्यें अेक लाख गांवामधून म. गांधीजींचा विचार व रचनेच्या कामाचे अभियान करावयाचे ठरवलेले आहे. महाराष्ट्रामध्यें या कार्यक्रमाचा विचार करून अहिंसक मार्गाने परिवर्तनाचे काम करणाऱ्या संघटना व व्यक्तिंच्या मार्फत कार्यक्रमाची आखणी करण्यासाठीं अेक बैठक रविवार दिनांक ८ अेप्रील १९९० रोजीं सकाळीं ११.०० वाजतां जळगांवला शिवाजीनगर मधील बालवाडीच्या स्थानामध्यें ठेवलेली आहे. या कार्यक्रमाला सर्वोदयी नेते प्रा. ठाकूरदास बंग, श्री. गंगाप्रसाद अग्रवाल, डॉ. अुषा मेहता व निरनिराळ्या संस्थांचे प्रमुख अुपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. बैठकीचे काम सकाळीं ११ ते दुपारीं ४ पर्यंत चालेल. बैठकीला येणाऱ्या प्रतिनिधींची भोजन निवासाची व्यवस्था करण्यांत आलेली आहे.
आपल्याला विनंती आहे कीं, आपण स्वतः अुपस्थित राहून तसेंच आपली संस्था व

संघटनेच्या प्रतिनिधींना पाठवण्याची कृपा करावी. आपण येत असल्याचे

श्री. नंदलाल काब्रा,
" राष्ट्रसेवक " कार्यालय,
कॉंग्रेस भवन, जळगांव

यांना कळविण्याची कृपा करावी.

आपले सहकार्य व मार्गदर्शन मिळावे अशी विनंती आहे.

सर्वांना नमस्कार. कळावे.

आपला

(जयवंत मठकर)

अध्यक्ष.